संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मतदारांचे अधिकार वाढवणारी सुधारणा हवी

**अकार्यक्षम** खासदारांना परत बोलवण्याचा अधिकार मतदारांना मिळावा, म्हणून भाजपाचे खासदार वरुण गांधी हे लोकसभेमध्ये खाजगी विधेयक सादर करणार आहेत. एखाद्या खासदाराला त्याच्याच बरोबर बसणाऱ्या खासदाराच्या अकार्यक्षमतेची जाणीव व्हावी, हे आम्हाला अधिक महत्त्वाचे वाटते. विधेयक सादर करणारी व्यक्ती कोणत्या पक्षाची आहे, याहीपेक्षा खासदार असणाऱ्या व्यक्तीनेच खासदारांच्या अकार्यक्षमतेविषयी उपस्थित केलेला प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. वरुण गांधी यांनी केलेली मागणी काही नवीन स्वरूपाची नाही. यापूर्वी अण्णा हजारे यांनीसुध्दा अशा प्रकारची मागणी केली होती. देशभरातून अनेक स्वयंसेवी संघटनांनी केवळ खासदारच नव्हे, तर लोकप्रतिनिधींच्या कामचुकारपणाबद्दल तक्रारी केल्या होत्या. लोकशाहीत लोकप्रतिनिधी निवडून देण्याचा जर मतदारांना अधिकार असेल, आणि जर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी योग्य काम करत नसेल किंवा मतदारांनी त्याच्यावर दाखवलेल्या विश्वासाचा तो अपमान करीत असेल, तर त्याला परत बोलवण्याचा अधिकारदेखील मतदाराला मिळाला पाहिजे. ज्या कारणांसाठी मत दिले किंवा ज्या अपेक्षांसाठी लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिलेले लोकप्रतिनिधी अपेक्षाभंग करीत असतील, तर मग त्यांना त्यांच्या अकार्यक्षमतेची जाणीव कोणत्या ना कोणत्या माध्यमातून करून देणे गरजेचे ठरते. आज लोकप्रतिनिधीत्वाच्या कायद्याखाली निवडून येणाऱ्या नगरसेवकांपासून ते खासदारांपर्यंत कोणावरही काम न केल्याबाबत कायदेशीर बंधन नाही किंवा मतदार त्याला जाबही विचारू शकत नाहीत. केवळ न्यायालयात जाणे हा एकमेव पर्याय राहू शकतो. एखाद्या लोकप्रतिनिधीविरुध्द तक्रार करायची झाल्यास, ती कोणाकडे करायची, असा प्रश्न निर्माण होतो. याकरिताच अण्णा हजारेंनी लोकपाल विधेयकाची आग्रही मागणी केली होती. पंतप्रधानांपासून ते नगरसेवकांपर्यंत कोणाही विरुध्द सामान्य माणसाला तक्रार करता आली पाहिजे. केलेल्या तक्रारीची चौकशी झाली पाहिजे. त्यासाठी लोकपाल ही संस्था किंवा यंत्रणा भक्कमपणे उभी केली पाहिजे. परंतु, आपल्या देशातले राजकारणी इतके हुशार आहेत की, त्यांनी लोकपाल विधेयक मंजूर तर केलेच, परंतु त्यात राजकारण्यांचा किंवा लोकप्रतिनिधींचा समावेश होणार नाही, अशी सोयीस्कर व्यवस्था केली. जगभरात अनेक देशांमध्ये लोकप्रतिनिधींना परत बोलवण्याचा मतदारांना अधिकार आहे. मग तो भारतात का असू नये, असा प्रश्न निर्माण होतो. केवळ निवडून जाणे आणि मतदारांना उत्तरदायी न राहणे, असे अमर्याद स्वातंत्र्य जर लोकप्रतिनिधींना मिळत असेल, तर ती गोष्टसुध्दा लोकशाहीचा अपमान करणारी ठरते आणि म्हणून आमचे तर असे म्हणणे आहे की, केवळ खासदारच नव्हे तर प्रत्येक निवडून जाणाऱ्या अकार्यक्षम लोकप्रतिनिधीला परत बोलवण्याची कायदेशीर तरतूद झाली पाहिजे.

### राजकारणाचा धंदा

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश मानला जातो. परंतु, लोकशाहीतल्या मूलतत्त्वांचा जर विचार केला, तर गेल्या ६५ वर्षांचा अनुभव खूप काही नवे अनुभव देणारा ठरला आहे. लोकमताचा आदर आणि एकूण स्वच्छ पारदर्शक राज्यकारभाराची ग्वाही ही या लोकशाही कारभाराचे एक मूलतत्त्व मानले जाते. दुर्दैवाने लोकमताचा अनादर करून गेल्या ६५ वर्षांमध्ये भ्रष्टाचार आणि गैरकारभार याचा अक्षरशः कडेलोट झाला. राजकारण समाजकारणाचा भाग न राहता त्याला एखाद्या धंद्याचे स्वरूप प्राप्त झाले. जनतेसाठी किंवा देशासाठी राज्यकारभार ही संकल्पनाही मागे पडली आणि स्वतःच्या स्वार्थाचा बाजार मांडण्याचा एकमेव उद्योग म्हणून राजकारणाने जागा घेतली. त्यातूनच पिढीजात राजकारण करण्याची अतिशय वाईट सवय भारतातल्या राजकारण्यांना लागली. यामुळे गैरकारभार आणि भ्रष्टाचार प्रचंड प्रमाणात बोकाळला. ही परिस्थिती लक्षात घेतली आणि जर लोकशाहीच्या मूल्यांचे संरक्षण करण्याचा मुद्दा लक्षात घेतला, तर निवडणूक सुधारणांची फार मोठी गरज निर्माण झाली आहे. हे लक्षात येईल. त्यामध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीला परत बोलवण्याच्या अधिकारापासून ते कोणत्याही व्यक्तीला कोणतीही निवडणूक फक्त दोन वेळा लढवण्याची संधी देण्यापर्यंत अनेक गोष्टींच्या सुधारणा अनिवार्य ठरतात. दहा दहा वेळा खासदार होणारे लोकशाहीतले हे ढुढ्ढाचार्य म्हणजे लोकशाहीच्या तत्त्वाचा अक्षरशः चिखल करणारे ठरतात. त्यातूनच मग राजकारण हा कमी श्रमामध्ये गडगंज पैसे कमावण्याचा एकमेव मार्ग असल्याचे मानले जाते. जगातील अन्य देशांमध्ये निवडणुकांच्या संदर्भात अनेक कठोर नियम केले गेलेले आहेत. अमेरिकेतसुध्दा तिथल्या अध्यक्षाला दोन वेळाच निवडणूक लढवता येते. भारतात मात्र असे कोणतेही बंधन नाही. तहहयात राजकारण करण्याची आणि पिढीजात राजकारणाचा धंदा करण्याची लोकशाहीने दिलेली ही मुभा कठोरपणे मोडून काढण्याची वेळ आलेली आहे.

### राजकारण आणि दलाली

आज नगरसेवक असो किंवा आमदार, खासदार असो. त्यांना निवडणुकीला उभे राहण्यासंदर्भातल्या कोणत्याही पात्रता स्पष्ट नाहीत. फक्त तो प्रौढ असावा आणि भारताचा नागरिक असावा, फार तर फार मतदार यादीत त्याचे नाव नसावे, अशा काही जुजबी गोष्टी सोडल्या तर कोणालाही निवडणुकीला उभे राहाता येते. मग त्याला भारताचे राष्ट्रगीत पाठ आहे का किंवा आपल्या राज्यातील जिल्ह्यांची संख्या किती हे तरी माहीत आहे का, अशा काही सामान्य ज्ञान असलेल्या गोष्टीदेखील माहीत नसतात. त्यावेळेला हे लोकप्रतिनिधी आहेत, की लोकशाहीच्या नावाने व्यापार करणारे दलाल आहेत, असा प्रश्न निर्माण होतो. दलालाचे काम फक्त कमिशन खाणे एवढेच असते. त्याला बाजाराच्या नीतीनियमांचीसुध्दा कल्पना नसते. ही सगळी परिस्थिती अतिशय उच्च मूल्य असलेल्या लोकशाही व्यवस्थेला पोखरून काढणारी ठरते. याकरिता लोकप्रतिनिधींना किंवा खासदारांना जाब विचारणारी आणि मतदारांच्या अधिकारात वाढ करणारी निवडणूक सुधारणा ही आता काळाची गरज ठरते.